# बी ए तृतीय वर्ष
# विषय राज्यशास्त्र
# प्राध्यापक पवार बी टी
# कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
# शिरूर कासार जिल्हा बीड

- ३) स्त्री मतअधिकाराचे समर्थन

- मिलच्या काळात स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त नव्हता त्यामुळे त्यांचे क्षेत्र हे चूल आणि मूल यापुरतेच मर्यादित होते यातून स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी मिलने स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्याचे समर्थन केले

- त्यांच्या मते समाजव्यवस्थेत श्री पुरुषांचा समान वाटा असतो त्यामुळे लिंगभेद त्याच्या आधारावर स्त्रियांना मतदानाचा अधिकार न करणे उचित नाही

- स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाकारणे म्हणजे जवळपास अर्ध्या लोकसंख्येला राजकारणात भाग घेण्यापासून वंचित करणे असे त्यांचे मत होते स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिल्याने त्यांचे राजकीय क्षेत्रातील प्रमाण वाढेल आणि समाजाच्या व राष्ट्राच्या विकासात हातभार लागेल असे मिलला वाटत होते

- ४) प्रतिनिधींना मानधन नसावे

- मिलच्या मते जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींना कोणत्याच प्रकारचे मानधन देण्यात येऊ नये

- कारण मानधन दिल्याने प्रतिनिधीः सेवाभावी वृत्तीने कार्य करू शकत नाहीत ते अनेक प्रकारच्या प्रलोभनांना बळी पडतात असे मिलचे मत आहे

- ## ५) खुल्या मतदान पद्धतीचा स्वीकार

- मिलच्या मते मतदानाचा अधिकार हा व्यक्तीचा पवित्र व नेते स्वरूपाचा अधिकार आहे त्यामुळे व्यक्तीला आपण कोणाला मत देतो हे कळणे गरजेचे आहे तसेच उघड मतदान पद्धती व्यक्ती उमेदवारांचे लायकी व समाजहित बघून मतदान करू शकतील

- यामुळे भ्रष्टाचाराला पायबंद बसेल असे मिलचे मत होते त्यामुळे त्यांनी गुप्त मतदान पद्धतीला विरोध करून खुल्या मतदान पद्धतीचा पुरस्कार केला आहे

- ## ६) द्विगृही विधिमंडळाचे समर्थन

- मिलच्या मते एक गृही सभागृह मुळे त्या सभागृहाची हुकूमशाही निर्माण होऊन अवैद्य कायद्याची निर्मिती होण्याची शक्यताही अधिक असते तसेच त्या सभागृहावर कामाचा अधिक ताण येतो

- त्यामुळे त्यांनी द्विगृही विधिमंडळ याचे समर्थन केले त्यांच्यामध्ये द्विगृही सभागृहामध्ये अवैद्य कायद्याने प्रतिबंध बसू शकतो व कामाची विभागणी झाल्याने कामाचा ताण कमी होऊ शकतो तसेच एका सभागृहाचे दुसऱ्या सभागृहावर नियंत्रण प्रस्थापित होण्यास मदत होते

## • ७) संसदेची कार्य

- मिलच्या मते संसदेचे कार्य हे पुढीलप्रमाणे सांगता येईल
- १) सरकारवर पूर्णतः नियंत्रण ठेवणे

- २) सहकाराच्या दृष्ट कृ त्यावर नियंत्रण ठेवणे
- ३) व्यक्ती विकासास पोषक ठरणाऱ्या कायद्याची निर्मिती करणे
- ४) पदभ्रष्ट शासनाला बडतर्फ करणे

- प्रातिनिधिक लोकशाही संस्थेचे कार्य मर्यादित ठेवण्यासाठी मिलने पुढील उपाय सुचवले आहेत संसदेने प्रशासन कार्याच्या भानगडीत पडू नये असे संसदेत असलेल्या तज्ञ व्यक्तीच्या समितीच्या माध्यमातून कायदे बनवावेत व प्रशासनासाठी स्थायी कर्मचारी नियुक्त करावेत